छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक
बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड

# मराठवाडा दर्शन

मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

Mo.9028349999
E-Mail : marathwadadarshannews@gmail.com
MARATHWADA DARSHAN
संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -२०६ | शनिवार दि.१८ एप्रिल २०२६ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-03 | Issue 206 | SATURDAY DT.18 APRIL 2026 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

**प्रतिनिधी पाहिजेत**
" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

# सरकारी कर्मचारी, शिक्षक मंगळवारपासून संपावर




मुंबई : सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त जागांची भरती, शिक्षकांना जुनी सेवानिवृत्ती योजना लागू करणे या आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील १७ लाख सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. राज्य सरकारने मागण्या मान्य न केल्यास मंगळवार, २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने शुक्रवारी दिला.

मागील कालखंडात अनेक प्रलंबित मागण्यांबाबत जी आश्वासने दिली होती त्याचा विसर सरकारला पडलेला आहे. आर्थिक आणि सेवाविषयक जिव्हाळ्याच्या मागण्यांबाबत राज्य सरकारने चालविलेली चालढकल ही कर्मचारी- शिक्षकांच्या जिव्हारी लागली आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित रास्त मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचारी, शिक्षकांनी गेल्या वर्षभरात सात वेळा संघटनात्मक लक्षवेधी आंदोलने छेडली. परंतु सरकारने आंदोलनांची कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळे राज्यातील १७ लाख कर्मचारी-शिक्षकांचा संताप अनावर झाल्याचे समन्वय समितीने यासंदर्भात जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

राज्य सरकारच्या वतीने सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतनासंदर्भात नियम आणि कार्यपध्दती तसेच अटी व शर्ती विषद करणारी अधिसूचना दोन वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप काढण्यात आलेली नाही. त्यामुळे १ मार्च २०२४ पासून आजपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतनदेखील अद्याप प्राप्त झालेले नाही. तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत १०:२०:३० वर्षानंतरच्या लाभापासून हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वंचित असल्याकडे समितीने सरकारचे लक्ष वेधले आहे.

सरकारी रिक्त पदे भरण्याचा वेग अतिमंद आहे. सध्या मंजूर पदांच्या ३५ टक्के पदे रिक्त आहेत. चतुर्थश्रेणी आणि वाहनचालकांच्या पदभरतीस १०० टक्के बंदी लादण्यात आली आहे. या अव्यवहार्य निर्णयाचा फेरविचार करणे आवश्यक असल्याची समितीची मागणी आहे.प्रस्तावित संपामुळे राज्यातील सरकारी कार्यालय, शाळा, रुग्णालय ठप्प होणार आहेत. मात्र, या संपातून अत्यावश्यक रुग्ण सेवा नियमितपणे सुरू राहील, अशी माहिती राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने दिली.

# कर्नाटकात भीषण दुर्घटना !



**कर्नाटकातील यादगीर जिल्ह्यात खासगी ट्रॅव्हल्स आणि कारचा भीषण अपघाताची दुर्घटना घडली. खासगी आराम बस आणि कार एकमेकांवर आदळल्याने लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील नऊ जणांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. यादगीर जिल्ह्यातील सुरपूर तालुक्यातील शांतगिरी क्रॉस येथे हा अपघात घडला. या घटनेनंतर स्थानिकांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली. मात्र, प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.**

खासगी आरामदायी बस बंगळुरुहून कलबुर्गीला निघाली होती, तर कार विरुद्ध दिशेने येत होती. भरधाव कार खासगी आराम बसला येऊन धडकली असता कारने लगेच पेट घेतला. या भीषण दुर्घटनेत कारमधील नऊ प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. तर, इतर प्रवाशांना आपला जीव वाचविण्यात यश मिळाले.

या दुर्घटनेत ट्रॅव्हल्समधील काही प्रवासी जखमी (घरीपरींज़र -ललळवशपीं) झाले असून त्यांना उपचारासाठी हॉस्पिटलला हलविण्यात आले आहे. बस आणि कार यांच्यातील अपघात आणि आगीचे वृत्त कळताच अग्निशमक दल पाण्याच्या वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. पण, तोपर्यंत कार आगीत जळून खाक झाली होती. अपघातात होरपळून मृत्यूमुखी पडलेले नऊ जण एकाच कुटुंबातील असून ते देव दर्शनावरून परत येत होते.

# हिंगणी हवेलीत शासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्तबगारांचा थाटात सत्कार



बीड ।प्रतिनिधी

शेतकरी कुटुंबातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, आपल्या जिद्दीच्या आणि चिकाटीच्या जोरावर शासकीय सेवेत यश मिळवणाऱ्या हिंगणी हवेली ग्रामपंचायतीमधील युवक-युवतींचा गौरवपूर्ण सत्कार सोहळा सोमवारी सायंकाळी हिगणी हवेली येथील जिल्हा परिषद शाळेत उत्साहात पार पडला. पटेल फाउंडेशनच्या वतीने आयोजित या सोहळ्याने संपूर्ण गावाचे वातावरण प्रेरणादायी बनले होते.

नुकतेच विविध शासकीय पदांवर रुजू झालेल्या या तरुणांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही उच्च ध्येय गाठून इतर तरुणांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या प्रेरणादायी सोहळ्याला अनेक दिग्गज मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली होती. यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विजयसिंह पंडित, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, मुजीब शेख, विनोद मुळुक, निजाम शेख ,मुफती आसीफ सहाब,फारुक पटेल ,यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान, गावाच्या वतीने शाहेद पटेल यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी हिगणी हवेली येथे एक सुसज्ज वाचनालय (लायब्ररी) उभारण्याची मागणी केली. या मागणीला आमदार विजयसिंह पंडित यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, वाचनालयासाठी तत्काळ मंजुरी देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी यशस्वी युवक-युवतींचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील मुलांच्या प्रगतीसाठी अशा कार्यक्रमांतून त्यांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. हा सत्कार सोहळा केवळ यशाचा आनंद साजरा करण्यासाठी नव्हता, तर गावातील इतर तरुणांना शिक्षणाचे आणि मेहनतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी एक व्यासपीठ ठरला. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या यशवंतांचा उत्साह वाढवला. या उपक्रमामुळे हिगणी हवेली आणि नांदुर हवेली परिसरात आनंदाचे वातावरण असून, गावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# जयंतीच्या मिरवणुकीत खोडा घालणारे नगरपालिकेचे
## अभियंता देशमुख आणि स्वच्छता सभापती निजाम यांनी राजीनामे द्यावेत - शुभम प्रधान

बीड ।प्रतिनिधी

१४ एप्रिल या महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती मिरवणुकी दरम्यान बीड शहरातील बशीरगंज चौकात गटारीतील घाण पाणी रस्त्यावर आले. यामुळे मिरवणुकीत अडथळा निर्माण झाला आणि याचा मोठा मनस्ताप नागरिकांना सहन करावा लागला. हा केवळ नागरिकांचा मनस्ताप नाहीतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान असल्याची धारणा समाजामध्ये निर्माण झाली आहे. यामुळे यास जबाबदार असलेले नगरपालिकेचे अभियंता देशमुख आणि पालिकेचे स्वच्छता सभापती निजाम शेख यांनी आपापल्या पदाचे राजीनामे द्यावेत, अशी मागणी युवा कार्यकर्ते शुभम प्रधान यांनी केले आहे.

१४ एप्रिल हा दिवस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा दिवस आहे. बाबासाहेबांची जयंती देशासह संपूर्ण जगात साजरी केली जाते. बीडमध्ये सुद्धा ही जयंती अत्यंत उत्साहात साजरी होते. १४ एप्रिल च्या दिवशी मिरवणुकी दरम्यान बीड नगरपालिके समोरच्या परिसरात तिथून जाणाऱ्या गटारीचे पाणी थेट रस्त्यावर आले. यामुळे मिरवणुकीत अडथळा निर्माण झाला. अनेकांना याचा मनस्ताप झाला. बाबासाहेबांच्या जयंतीत गटारीचे पाणी सोडल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली. यामागे नेमके कोण जबाबदार आहे? याची चौकशी होण्याची गरज आहे. शहराची स्वच्छता सुरळीत करण्याची जबाबदारी अभियंता देशमुख आणि स्वच्छता सभापती असलेले निजाम शेख यांच्यावर आहे. बाबासाहेबांची जयंती आणि त्यांची मिरवणूक हा संवेदनशील विषय असतानाही याकडे जबाबदार अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. जयंतीचा दिवस हा सर्वांना ठाऊक आहे अशावेळी पालिकेने अगोदरच खबरदारी घ्यायला पाहिजे. मात्र ती का घेतली गेली नाही.? पालिकेचे स्वच्छता सभापती असलेले निजाम शेख हे काय करीत होते.? नाल्यांची दुरुस्ती आणि इतर व्यवस्था ज्यांची जबाबदारी आहे असे पालिकेचे मुख्य अभियंता देशमुख काय करीत होते.? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. निवडणुकीमध्ये घाण आणि आल्याने जो खोडा निर्माण झाला याला देशमुख आणि निजाम शेख हेच जबाबदार आहेत. यामुळे या दोघांनी आपापल्या पदाचे राजीनामे द्यावेत अशी मागणी युवा कार्यकर्ते शुभम प्रधान यांनी केली आहे. याबाबत लवकरच मोठे आंदोलन उभा करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# दुकान गाळ्यामध्ये छापा टाकुन २,४५, ३२८/- रूपयाचा गुटखा जप्त




बीड (प्रतिनिधी)

पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या आदेशाने पोउपनि श्रीराम खटावकर व पथक अवैध धंद्यावर कारवाई करणे करीता नवगण राजुरी परिसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, नवगण राजुरी येथील सरकारी दवाखान्या समोरील गाळ्यामध्ये एका इसमाने महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला विविध कंपनीचा गुटखा विक्री करण्यासाठी साठवुन ठेवलेला आहे. मिळालेली माहिती पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांना देवुन त्याच्या आदेशाने पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/ राहुल शिंदे, गोविंद राख, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, पोअ/मनोज परजणे, अशफाक सय्यद, चापोह / नितीन वडमारे यांनी दि.१६.०४.२०२६ रोजी सकाळी १०.१५ वाचे सुमारास छापा टाकुन इसम नामे विकास महादेव टुले वय ३० वर्षे रा. नवगण राजुरी ता. जि. बीड याच्या ताब्यातुन वेगवेगळ्या कंपनीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा किमंती अंदाजे २,४५,३२८ /- रूपयाचा माल जप्त करून विकास महादेव टुले वय ३० वर्षे रा. नवगण राजुरी ता. जि. बीड याच्याविरूध्द पोस्टे बीड ग्रामिण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत साहेब, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब व पोनि श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि श्रीराम खटावकर पोह/ राहुल शिंदे, गोविंद राख, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, पोअ / मनोज परजणे, अशफाक सय्यद, चापोह / नितीन वडमार यांनी मिळुन केली आहे.

# भोंदू खरात प्रकरणातील महत्त्वाचा साक्षीदार ठार



मुंबई : भोंदू अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉक्टर जितेंद्र शेळके यांचा आज अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या कारने समृद्धी महामार्गावर उभ्या असणा-या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके यांच्यासह त्यांच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, जितेंद्र शेळके आज दुपारी १ च्या सुमारास आपल्या कुटुंबासह छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात होते. रस्त्यात समृद्धी महामार्गावरील धोत्रे गावालगत त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असणा-या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके व त्यांची पत्नी अनुराधा हे दोघे जागीच ठार झाले. तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला. ही धडक एवढी भीषण होती की, त्यांची कार थेट कंटेनरखाली घुसली. त्यामुळे तिचा अक्षरशः चुराडा झाला. जखमी मुलाला लगतच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.



# माजलगाव ग्रामीण पोलिसांची धडाकेबाज कारवाई

माजलगाव : (प्रतिनिधी )

माजलगाव ग्रामीण पोलिसांनी अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करत सुमारे १० लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मा. नवनीत काँवत (पोलीस अधीक्षक, बीड) व मा. चेतना तिडके (अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई) यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच परि सहा. पोलीस अधीक्षक राहुल कुमार ( आयपीएस ) यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

दि. १५ एप्रिल २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पुरूषोत्तमपुरी शिवारातील गोदावरी नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून ती ४०७ वाहनाद्वारे वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे सकाळी सुमारे ११.३० वाजता पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला.

या कारवाईत पोलिसांनी ४०७ वाहनासह अंदाजे १०,००,००० रुपये किंमतीचे वाहन व सुमारे ६,००० रुपये किंमतीची वाळू असा एकूण १०,०६,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. हा मुद्देमाल दोन पंचासमक्ष जागीच जप्त करण्यात आला.

या प्रकरणी वाहन चालक पांडुरंग तात्यास कोळेकर (रा. पुरूषोत्तमपुरी) व वाहन मालक सुभाष वसंत करे (रा. पुरूषोत्तमपुरी) यांच्याविरुद्ध कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून भारतीय दंड संहितेनुसार पुढील तपास सुरू आहे.सदर कारवाई परि सहा. पोलीस अधीक्षक राहुल कुमार (खझड), पोलीस अंमलदार गोविंद बाबरे (क्र. १९४७), विलास चव्हाण (क्र. २११५) व गणेश राजाराम राऊत (क्र. ५३) तसेच माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने पार पाडली.या कारवाईमुळे परिसरातील अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाली असून पोलिसांच्या कारवाईचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# प्रा. गौतम गायकवाड व पत्रकार प्रशांत मस्के यांची अनपेक्षित भेट; विचारांची समृद्ध देवाणघेवाण

अंबाजोगाई (प्रतिनिधी) : उमेश शिंदे

खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य, आदरणीय लेखक प्रा. श्री. गौतम गायकवाड यांची त्यांच्या निवासस्थानी दै. बीड सत्ता चे अंबाजोगाई तालुका प्रतिनिधी तथा पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांची योगायोगाने झालेली भेट अत्यंत आनंददायी व प्रेरणादायी ठरली.



या अनपेक्षित भेटीत शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील विविध विषयांवर सखोल चर्चा रंगली. प्रा. गायकवाड यांनी आपल्या समृद्ध लेखनप्रवासाची माहिती देत अध्यापनातील अनुभव, विद्यार्थ्यांच्या घडणीत शिक्षकांची भूमिका आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व यावर मनमोकळेपणाने विचार मांडले. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ गुणांपुरते मर्यादित न राहता नैतिकता, सामाजिक बांधिलकी आणि विवेकशीलता यांचा अंगीकार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

प्रा. गायकवाड यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, अभ्यासू वृत्ती आणि समाजाभिमुख दृष्टीकोन यामुळे ही भेट अधिकच संस्मरणीय ठरली. त्यांच्या साहित्यकृतींमधून समाजातील वास्तवाचे जिवंत चित्रण होत असून, वाचकांना विचारप्रवृत्त करण्याची ताकद त्यांच्या लेखनात असल्याचे यावेळी चर्चेतून स्पष्ट झाले.

पत्रकार प्रशांत मस्के यांनीही ग्रामीण भागातील बदलत्या सामाजिक घडामोडी, पत्रकारितेतील आव्हाने आणि लोकसंपर्कातून आलेले अनुभव याविषयी आपले मत व्यक्त केले. ग्रामीण पत्रकारितेमध्ये सत्यता, जबाबदारी आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. समाजातील उपेक्षित घटकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे ही पत्रकारितेची खरी जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या संवादातून शिक्षण आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्याची आवश्यकता अधोरेखित झाली. समाजपरिवर्तनासाठी शिक्षक आणि पत्रकार यांनी एकत्रितपणे काम केल्यास अधिक सकारात्मक बदल घडू शकतो, असा विश्वास दोघांनी व्यक्त केला.

प्रा. गौतम गायकवाड हे केवळ एक उत्तम शिक्षकच नव्हे, तर संवेदनशील लेखक म्हणूनही ओळखले जातात. त्यांच्या साहित्यकृतींमधून सामाजिक वास्तव, मानवी मूल्ये आणि बदलत्या काळाचे चित्रण प्रभावीपणे मांडले जाते. अशा विद्वान व्यक्तीशी प्रत्यक्ष भेट होणे ही एक समृद्ध करणारी अनुभूती असल्याचे मत प्रशांत मस्के यांनी व्यक्त केले.

या अनपेक्षित भेटीतून विचारांची देवाणघेवाण झाली, नव्या उर्जेची प्रेरणा मिळाली आणि भविष्यातही अशा सकारात्मक संवादांची मालिका सुरू राहील, अशी अपेक्षा दोघांनी व्यक्त केली.

# अभ्यासातून बाबासाहेबांना अभिवादन

## ग्रामऊर्जा फाउंडेशनचा १८ तास अभ्यास संकल्प

किल्ले धारूर /अविनाश जगताप

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ग्रामऊर्जा फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी १८ तास अभ्यास संकल्प उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे.

हा उपक्रम ग्रामऊर्जा फाउंडेशन कार्यालय,विद्युत नगर, पाण्याच्या टाकी शेजारी, मोरेवाडी, अंबाजोगाई येथे पार पडणार आहे.या संकल्पामध्ये सहभागी होऊन सलग १८ तास अभ्यास पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची सवय, शिस्त आणि चिकाटी निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. हा प्रेरणादायी संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा पुरस्कार व ग्लोबल स्टार टीचर अवॉर्ड साठी विठ्ठल अनमुलवाड यांची निवड

पूर्णा (जि. परभणी)

अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा, पूर्णा येथील शिक्षक विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड यांनी आपल्या मेहनती, नाविन्यपूर्ण आणि विद्यार्थीकेंद्रित कामामुळे शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा पुरस्कार २०२६ आणि ग्लोबल स्टार टीचर अवॉर्ड २०२६ या दोन प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी निवड झाली आहे.

अनमुलवाड यांनी भविष्यवेधी शिक्षण या संकल्पनेवर काम करत पारंपरिक अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश केला आहे. ते धीर्ढीलशच्या माध्यमातून शैक्षणिक व्हिडिओ तयार करून विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने अभ्यास समजावून सांगतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासावरील रस वाढला आहे. सेल्फी विथ सक्सेस या उपक्रमातून त्यांनी २०० पेक्षा जास्त शैक्षणिक आव्हाने पूर्ण केली आहेत. तसेच जो दिनांक तो पाढा, पुस्तक वाचन, थश डशरीप एपसश्रळीह, थश डशरीप गररिपशीश यांसारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली काही विद्यार्थ्यांनी कथा, कादंबरी, महापुरुषांची ५० च्या वर पुस्तके वाचली असून वाचनाची चांगली सवय लावली आहे. हस्ताक्षर स्पर्धा आणि शिष्यवृत्ती परीक्षांसाठी घेतलेल्या अतिरिक्त तासिकांमुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारली आहे.

अनमुलवाड हे अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र आणि 'ई-बालमासिक'मध्ये उपसंपादक म्हणूनही कार्य करत आहेत. त्यांनी एर्वी तंत्र या राज्यस्तरीय मासिकात तसेच विविध वृत्तपत्रांत लेख लिहिले आहेत. संपूर्ण मराठी शब्दसराव लेखन पुस्तिका आणि ऊेश्रिशींश एपसश्रळीह थींव थीळींळपस झीरलींळलश इेेज्ञश्रशीं ही त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत.यापूर्वीही त्यांच्या कार्याचा सन्मान अनेक पुरस्कारांनी करण्यात आला आहे. महाराष्ट्र शिक्षक पॅनलचा राज्यस्तरीय सेवासन्मान पुरस्कार, ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्रचा आदर्श शिक्षक पुरस्कार, आमदार रत्नदीप आदर्श शिक्षक पुरस्कार, माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन, मलकापूरचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच समर्थ कार्यगौरव पुरस्कार त्यांनी मिळवले आहेत.



त्यांच्या या यशाबद्दल शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष मा. आनंदजी अजमेरा, माजी मुख्याध्यापक मा. हिराजी भोसले, संचालक मा. दिलीप माने, मुख्याध्यापक मा. सत्यनारायण रणवीर, मुख्याध्यापिका सौ. निर्मला रेड्डी, पर्यवेक्षक मा. रमेश सूर्यवंशी तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# माजलगावात श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त व्याख्यानाचे आयोजन

माजलगाव ।प्रतिनिधी

समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने भगवान श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त भव्य व धार्मिक वातावरणात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन दि. १८ एप्रिल २०२६ रोजी रात्री ६ ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. भगवान श्री परशुराम कार्य या विषयावर होणाऱ्या या व्याख्यानामुळे समाजातील तरुण पिढीला संस्कार व परंपरेची प्रेरणा मिळणार असुन व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक श्री विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहणार आहेत.

भगवान परशुराम हे शौर्य, धर्मनिष्ठा व न्यायप्रियतेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या जीवनातील आदर्श व कार्य आजच्या काळातही मार्गदर्शक ठरत असल्याने या विषयावर सखोल मार्गदर्शन व्हावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेशकाका मोगरेकर हे तर व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहून भगवान परशुराम यांच्या कार्याचा ऐतिहासिक, सामाजिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून सांगणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश भानप (सचिव, श्री सद्गुरू सेवा समिती, पंढरपूर), डॉ. स्वानंद कुलकर्णी (नेत्रतज्ञ, माजलगाव) हे कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम दि. १८ एप्रिल २०२६ रोजी श्री दत्त मंदिर, समित्र कॉलनी, माजलगाव येथे पार पडणार असून मोठ्या संख्येने ब्राह्मण समाजातील बांधव-भगिनींनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे समाजातील एकोपा वृद्धिंगत होण्यासोबतच धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचे




जतन होणार असुन युवा पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरत आहेत. दरम्यान व्याख्यानानंतर महाआरती होईल व तद्नंतर प्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे.

# जीवन प्रगती विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा व कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न

नांदुर घाट - ता. १२/४/२०२६ जीवन प्रगती शिक्षण संस्था अंतर्गत जीवन प्रगती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदुर घाट येथे इयत्ता दहावी १९९४ बॅच च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा व कृतज्ञता सोहळा उत्साह पूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमास विद्यमान प्राचार्य विलास ढाकणे सर, माजी प्राचार्य राम मोराळे सर, माजी प्राचार्य श्री. मच्छिंद्र तांबडे सर, आदरणीय श्री. व्हि. डी. जाधव सर आदरणीय श्री. जीवन धर्माधिकारी सर आदरणीय श्री. बन्सी तोगे सर, श्री गिरी सर, प्रा. सतीश मोराळे सर, श्री. कानडे सर, श्री. गौतम मगरे सर, श्री. शौकत पठाण सर यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिवाय शिक्षक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात तमसो मा ज्योतिर्गमय तमसो मा ज्योतिर्गमय तमसो मा ज्योतिर्गमय अशा जय घोषणांनी करण्यात आली. सूत्रसंचालन आणि शिक्षकांच्या मार्गदर्शन पर मनोगता मुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांचा विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांचे स्मरण करण्यात आले. प्रास्ताविक श्री. शौकत पठाण सर यांनी केले तर सूत्रसंचालन माजी विद्यार्थी श्री. जयंत चौधरी यांनी केले. माजी विद्यार्थ्यां पैकी डॉ. प्रा. अरुण राख, डॉ. सतीश तांबडे , पोलीस निरीक्षक बाळासाहेब आघाव, आर्किटेक्ट व इंजिनियर श्री. मनोज पुजारी,माजी सैनिक ईश्वर गपाट, मनपा अधिकारी श्री.



गंगाराम पवार सर, प्रा. औदुंबर ढाकणे सर प्राध्यापक अनंत आघाव सर, सामाजिक कार्यकर्तेही व उद्योगपती श्री. जीवन हांगे, प्रगतशील शेतकरी हनुमंत आंधळे सर, कृषी अधिकारी श्री. कमलाकर शिंदे, आदर्श परिवाहक श्री. प्रकाश स्वामी, तसेच पर्यावरण अधिकारी व शैक्षणिक संस्था चालक श्री. विक्रम जाधवर सर यांचा शाळेतर्फे प्राचार्य विलास ढाकणे सर यांनी शाल, श्रीफळ,व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार केला. माजी प्राचार्य राम मोराळे सर, माजी प्राचार्य मच्छिंद्र तांबडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर आभार प्रदर्शन श्री. ईश्वर गपाट व प्रा.रवी हांगे सर यांनी केले. या मेळाव्यात सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. ३२ वर्षानंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना



**बीड ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील व महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक तथा लोकप्रिय दैनिक न्याय टाइम्स या वर्तमानपत्राचे मा सहसंपादक अनिल जी कचरे साहेब यांची आज जिल्हा बीड येथे बऱ्याच दिवसानंतर बीड येथे आज भेट होऊन महाराष्ट्रातील व बीड जिल्ह्यातील महत्त्वाच्या विविध विषयावर व घडामोडीवर चर्चा संपन्न झाली व मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांची नुकतीच काही दिवसापूर्वी महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ज्येष्ठ मार्गदर्शक तथा संपादक अनिल जी कचरे साहेब यांनी समाधान व्यक्त केले व येणाऱ्या भविष्य काळामध्ये माननीय नवनाथ जी अण्णांच्या माध्यमातून लोकशाही पत्रकार संघाला एक चांगल्या प्रकारे चालना व प्रेरणा मिळाली**

# चि.धैर्य अमित शेटे यांनी १० सी बी एस ई परीक्षेत उंच भरारी

किल्ले धारूर/अविनाश जगताप

नुकत्याच संपन्न झालेल्या १० वी सी बी एस ई बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला, त्यामध्ये किल्ले धारूर येथील प्रतिष्ठित व्यापारी यशवंत शेटे यांचा नातु तर वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात असणारे डॉ. अमित शेटे यांचा मुलगा धैर्य हा १० वी मध्ये पोतदार इंग्लिश स्कुल अंबाजोगाई येथून बोर्डाची परीक्षा दिली होती, त्यात त्याने ९८% गुण घेऊन विशेष प्रविण्य मिळवले, अतिशय हुशार, शांत, संयमी व्यक्तिमहत्व असणारा चि.धैर्य याने अतिशय जिद्दीने, सतत अभ्यास करत घरातून या अभ्यास साठी सर्वांनी पोषक असे वातावरण त्याला निर्माण केले होते,रेगुलर शाळा अंबाजोगाई येथे जाऊन करत, अभ्यासाला प्राधान्य देत दिवसाची रात्र एक करत चि. धैर्य अमित शेटे याने ९८% प्राप्त केले, त्याच्या या गगन भरारी यशा बद्दल मित्र परिवारा



तर्फे त्याचा हृदय सत्कार शेटे निवास स्थानी करण्यात आला, प्रसंगी माजी नगरसेवक बाळासाहेब सोनटक्के, अभिजीत ड्रेसेस चे रुपेश चिद्रवार, विशाल मोबाईल चे अमरसिंह दिखखत, किराणा व्यवसायिक सुजित गुंडेवार, ग्रामसेवक शंकर हेडगिरे,खरेदी विक्री संघांचे संचालक ज्ञानेश्वर शिंदे, पंकज वडगावकर हे उपस्थित होते.चि. धैर्य अमित शेटे याने पुढील शिक्षण पुणे येथे घेणार असून आय टी क्षेत्रात जाण्याची तयारी त्याने दाखवली,या क्षेत्रात जाऊन नवनवीन कल्पना ना नवनवीन तंत्रज्ञानाची जोड देत काहीतरी युनिक करण्याचे स्वप्न त्याने बोलून दाखवले.

# ईश्वरी खेत्रे हिचे सिबीएसई दहावी बोर्ड परिक्षेत यश

## इंग्रजी विषयात मिळविले शंभर पैकी शंभर गुण

दैनिक मराठवाडा दर्शन किसनजी पवार.

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथील १३ किलोमीटर अंतरावर असलेले रहिवाशी असलेली व संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कुल लातुरची विद्यार्थीनी ईश्वरी रुक्मानंद खेत्रे हिने दहावी सिबीएसई बोर्ड परिक्षेत ९२ टक्के गुण प्राप्त करत घवघवीत यश मिळविले आहे. तिने किती आडगाव ची मान उंचावेल असं नाव कमवेल आहे.



ईश्वरी खेत्रे हिने इंग्रजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत शाळेत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. ग्रामीण भागाची पार्श्वभुमी असलेल्या ईश्वरी रुक्मानंद खेत्रे ने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कुलचे संचालक बी. ए. मैंदरगे, प्राचार्या विना कोपकर, शिक्षीका प्रभावती स्वामी यांचेसह पालक, मित्र, आप्तेष्ट, नातेवाईकांनी अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# मंजरथ येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित समिती स्थापन विविध कार्यक्रमाचे आयोजन

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंती निमित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. दिपक खरात यांच्या अध्यक्षतेखाली जयंती उत्सव समिती निवड करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी शरद खरात यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी परमेश्वर थोरात,कोशाध्यक्ष पदी मोकिंद खरात सचिवपदी विशाल खुणे, महेश माने सहसचिवपदी विश्वास माने, महादेव थोरात संघटकपदी काशिनाथ थोरात, नामदेव पाडमुख, अर्जुन सिरसट, माणिक खुणे, श्याम खुणे, अशोक माने कृष्ण चुंबळे यांची निवड एकमताने करण्यात आली या बैठकीस सचिन पाडमुख यांच्या सह संतोष खुणे, विलास डोंगरे, सुरेश खरात,रामकिशन थोरात, सुभाष थोरात,भीमराव खुणे, सुनील खरात, बाबासाहेब डोंगरे, संदीपान पाडमुख लक्ष्मण सोनकांबळे, रमेश खुणे,रमेश खरात, अनिल खरात, अशोक खरात आकाश माने, नाना खरात, दामोदर माने, सचिन खरात, दासू माने, राधाकिश थोरात , गणेश थोरात आदिसह समाज बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते जयंतीनिमित विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये रक्तदान शिबिर, रांगोळी स्पर्धा, भाषण स्पर्धा, तसेच ह. भ. प. ज्ञानेश्वर वाबळे महाराज यांचे शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे परिवर्तनवादी कीर्तनाचा कार्यकाम ठेवण्यात आला आहे संध्याकाळी ५.०० वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य ढोल ताशा च्या गजरात फुलाची उधळण करून फडक्याची आतषबाजी करत मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

# मोदी सरकार तोंडघशी! महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर

नवी दिल्ली : महिलांना आरक्षण देण्यासाठीच्या घटनादुरुस्ती विधेयकासह अन्य दोन विधेयके मंजूर करण्यासाठी संसदेचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून अवघ्या देशाचे लक्ष वेधून घेण्याची कृती केंद्र सरकारच्या चांगलीच अंगलट आल्याचे शुक्रवारी स्पष्ट झाले. मोदी सरकारने मांडलेले घटनादुरुस्ती विधेयक आवश्यक बहुमताच्या अभावी शुक्रवारी लोकसभेत मंजूर न झाल्याने केंद्र सरकारवर मोठी नामुष्की ओढवली. त्यामुळे या विधेयकासमवेतच मांडण्यात येणारी अन्य दोन विधेयकेही मागे घेण्याची वेळ सरकारवर आली. हा मोदी सरकारसाठी मोठा धक्का मानला जात आहे. या महत्त्वपूर्ण विधेयकावर झालेल्या मतदानावेळी सभागृहात एकूण ५२८ सदस्य उपस्थित होते. त्यापैकी २९८ सदस्यांनी विधेयकाच्या समर्थनार्थ तर २३० सदस्यांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केले. घटनेनुसार, हे विधेयक मंजूर करण्यासाठी दोन-तृतीयांश बहुमताची (३५२ मते) आवश्यकता होती. मात्र, समर्थनातील मतांचा आकडा या मर्यादेपेक्षा ५४ ने कमी पडल्याने विधेयक संमत झाले नाही.

संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी महिला आरक्षण विधेयकासह (नारी शक्ती वंदन अधिनियम) घटनादुरुस्ती आणि मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेशी संबंधित तीन महत्त्वाच्या विधेयकांवर राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. लोकसभेत गुरुवारी दिवसभर या विधेयकावर सखोल आणि वादळी चर्चा झाली. यानंतर शुक्रवारी महिला आरक्षण विधेयकावर मतदान पार पडले. यावेळी महिला आरक्षण विधेयकासाठी एकूण ५२८ सदस्यांनी मतदान केले. हे विधेयक मंजूर होण्यासाठी



दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता होती. मात्र दोन-तृतीयांश मते न मिळाल्याने महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर झाले नाही. यानंतर उर्वरित दोन विधेयकेही केंद्र सरकारने मागे घेतली आहेत.महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, एकूण ५२८ मते पडली, त्यापैकी २९८ मते विधेयकाच्या बाजूने आणि २३० मते विरोधात पडली. पहिल्या फेरीत एकूण ४८९ मते पडली, त्यापैकी २७८ मते विधेयकाच्या बाजूने आणि २११ मते विरोधात पडली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले की, संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर न झाल्यामुळे, त्यासंबंधित दोन विधेयके परिसीमन विधेयक- २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक-२०२६ पुढे जाऊ शकत नाहीत.

सरकारने लोकसभेची सदस्यसंख्या सध्याच्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. २०११ च्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करून २०२९ च्या निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण लागू करण्याचा सरकारचा मानस होता, जो आता विरोधकांच्या विरोधामुळे अपयशी ठरला आहे.

पंतप्रधानांना थेट आव्हान

मोदींना थेट आवाहन देताना गांधी म्हणाले, जर पंतप्रधानांना खरोखरच महिलांना आरक्षण द्यायचे असेल, तर त्यांनी २०१३ चा (किंवा २०२३ चा मूळ) कायदा आणावा. आम्ही त्याला विनाशर्त पाठिंबा देऊ आणि आजपासूनच महिला आरक्षण लागू करण्याची खात्री देऊ.राहुल गांधी यांनी 'एक्स'वर पोस्ट करताना म्हटले की, दुरुस्ती विधेयक पडले आहे.

## तनपुरेंना भाजपची खुली ऑफर; तनपुरेंनीही स्पष्टच सांगून टाकले

### मुख्यमंत्र्यांच्या सभेच्या दिवशी ठरणार तनपुरेंची राजकीय दिशा / २० तारखेला कार्यकर्त्यांचा राहुरीत मेळावा । माजी मंत्री तनपुरेंच्या निर्णयाकडे मतदारसंघाचे लक्ष

अहिल्यानगर / प्रशांत बाफना

राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची राजकीय रणधुमाळी सुरू आहे. भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी राजकीय पातळीवरील स्टार प्रचारक नेत्यांच्या सभेने वातावरणात रंगत भरली असून, २० एप्रिलला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा होणार आहे. दुसरीकडे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी निवडणुकीतून माघारी घेतली असली तरी त्यांनी अजून कोणाला पाठिंबा दिला नसून, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार रिंगणात असूनसुद्धा त्यांनी प्रचाराकडे पाठ फिरविली आहे. भाजप नेत्यांकडून त्यांना पक्ष प्रवेशाची ऑफर देण्यात आली असली तरी अद्याप त्यांनी पक्ष प्रवेश करायचा की नाही, याबाबत कोणताचा निर्णय घेतला नाही. २० तारखेला कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला असून, कार्यकर्त्यांची मते जाणून घेतल्यानंतर प्राजक्त तनपुरे हे पुढील भूमिका जाहीर करणार असल्याने या निर्णयाकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

भाजपचे आमदार स्व. शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने राहुरी मतदारसंघाची पोटनिवडणूक होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून अक्षय कर्डिले रिंगणात आहेत. दुसरीकडे अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी भाजप प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या कार्यालयात जात त्यांच्याशी चर्चा केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी फोनवरून बोलणे करून दिल्याने तनपुरे यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघारीचा निर्णय जाहीर केला. राहुरी तालुक्याचा विकास, भूसंपादनाचे प्रश्न आणि सहकारी साखर कारखाना वाचवणे या मुद्द्यांवर मुख्यमंत्र्यांनी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिल्याने माजी मंत्री तनपुरे यांनी निवडणुकीतून ऐनवेळी माघार घेतल्याचे सांगितले.

दरम्यान, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माजी जिल्हा परिषद सदस्य गोविंद मोकाटे हे निवडणुकीच्या रिंगणात आहे. याशिवाय शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे अपक्ष तर यांच्यासह सात उमेदवार निवडणूक लढत आहे. भाजप उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारासाठी प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांनी दोन सभा घेत कर्डिले यांना निवडून देण्याचे आवाहन केले. तसेच प्राजक्त तनपुरे यांना पक्षात येण्याची ऑफर दिली. सभापती राम शिंदे, उमेदवार अक्षय कर्डिले यांनीही तनपुरे भाजपमध्ये आल्यास त्यांचे स्वागत असल्याचे सांगितले. त्यामुळे तनपुरे यांना भाजपमध्ये घेण्यासाठी भाजपची मंडळी उत्सुक असली तरी भाजपमध्ये यायचे की नाही, याचा निर्णय अजून तनपुरे यांनी जाहीर केला नाही. याशिवाय निवडणुकीतून माघार घेतली असली तरी त्यांनी पक्षाचा प्रचार केला नसून, कोणालाच पाठिंबा दिला नसल्याने त्यांच्या भूमिकेकडे सगळ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. यामुळे कार्यकर्त्यांत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. यासंदर्भात दि.२० एप्रिल रोजी त्यांनी राहुरीत कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला असून, या मेळाव्यात ते कार्यकर्त्यांशी चर्चा करून निर्णय जाहीर करणार असल्याने माजीमंत्री तनपुरे यांच्या निर्णयाकडे राष्ट्रवादीसह भाजपच्या नेतेमंडळी व कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

उमेदवारी न भरता पाठिंबा दिला, आता अधिकृत पाठिंबा द्यावा : सभापती शिंदे

राहुरी पोटनिवडणुकीची रणधुमाळी सुरु असून २३ एप्रिलला मतदान होणार आहे. मतदारसंघात प्रचार सुरु आहे. याच प्रचारादरम्यान भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांना भाजपमध्ये येण्याची ऑफरच दिली आहे. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला, तर त्यांचे स्वागतच आहे असे ते म्हणाले आहेत. दरम्यान, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी तालुयाच्या विकासासाठी सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे सांगितले. तनपुरे भाजपमध्ये आले, तर आम्ही दोघे मिळून राहुरी मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करू असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. तनपुरे यांनी उमेदवारी न भरता पाठिंबा दिला आहे, आता त्यांनी अधिकृत पाठिंबा द्यावा असे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले

## अल-खैर मल्टीपर्पज फाऊंडेशन कडून दोन ठिकाणी थंडगार पाणपोई केंद्राचे अझहर इनामदार यांच्या हस्ते उद्घाटन

बीड ।प्रतिनिधी

अल-खैर मल्टीपर्पज फाऊंडेशन, बीड जिल्ह्यातील एक प्रसिद्ध सामाजिक सेवा संस्था, यांनी आज शहरात दोन ठिकाणी पाणपोई केंद्रांचे उद्घाटन केले. दरवर्षीप्रमाणे हे पाणपोई केंद्र पुढील दोन महिने चालतील आणि गरजू लोकांची उन्हात तहान भागवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

अल-खैर अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रात मानवतावादी सेवा करत आहे. संस्थेचे कार्य अन्नदान,चॅरिटेबल क्लिनिक ,रक्तदान शिबीरे, शिक्षण साहित्य वाटप, आरोग्य कॅम्प, पोलिस भरती प्रशिक्षण आणि आता उन्हाळ्यात गरजूंना पिण्यासाठी थंडगार पाणपोई केन्द्र सुरू करणे यासारख्या उपक्रमामधून सामाजिक कार्य आणि मानवाची सेवा




करीत आहे. आपसात बंधू प्रेम वाढवावा हा या मागचा हेतू.

आजच्या उद्घाटन समारंभात अल खैर मल्टिपर्पज फाउंडेशन चे अध्यक्ष अझहर इनामदार साहेब व दैनिक 'पार्श्वभूमी'चे मुख्य संपादक श्री गंमत भाऊ भंडारी, रजी सर, रफत सर, अजीम सर यांचा समावेश होता.

अलिकडील वर्षांत उन्हाळ्याची तीव्रता वाढत आहे आणि अनेक गजबजलेल्या भागात पाण्याची कमतरता जाणवते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, अल-खैरने छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि भाजी मंडई, पार्श्वभूमी कार्यालयासमोर दोन पाणपोई केंद्राची स्थापना केली आहे.अल-खैर फाऊंडेशन दरवर्षी उन्हाळ्यात दोन महिने हे पाणपोई केंद्र चालवून गरजूंना मदत करते आणि मानवतेचा संदेश देते.या समारंभात अल-खैर फाऊंडेशनचे अध्यक्ष इंजिनिअर अझहर इनामदार, उपाध्यक्ष मोमीन रझिउद्दीन, सचिव आमिर खान, सय्यद अझीम अली, सय्यद आतिफ खतीब, माजीद खान, शेख रफत शाहरुख, गुलाम साकिब सर आणि इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

## बीडमध्ये उद्या सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम

बीड (प्रतिनिधी)

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त उद्या दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून, या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भीमगीतांच्या कार्यक्रमांतून नागरिकांना सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक आनंदाचा अनुभव घेता येणार आहे.आमदार संदीप क्षीरसागर यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांची भीमगीते समाजाला प्रेरणा देणारी आणि जागृती निर्माण करणारी आहेत. या कार्यक्रमात सहभागी होऊन आपण सर्वांनी सामाजिक एकता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश पुढे न्यावा, असे आ.क्षीरसागर यांनी म्हटले आहे. हा कार्यक्रम बीडमधील सर्व वयोगटातील नागरिकांसाठी खुला असून, मोठ्या उत्साहात त्याचे आयोजन करण्यात येत आहे. उपस्थितांना भीमगीतांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव अनुभवता येईल

## बहन मायावतीजी यांची लवकरच देशात सत्ता येणार - ॲड. सुनील डोंगरे



नांदेड (प्रतिनिधी) : बहन मायावतीजी यांची लवकरच देशात सत्ता येणार असून महाराष्ट्रानेही त्यात आपला वाटा उचलला पाहिजे, यासाठी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत आहे अशी माहिती बहुजन समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ड. सुनील डोंगरे यांनी दिली.

धाराशिव जिल्ह्यात मुरुम येथे आयोजित बसपाच्या कार्यक्रमास जात असताना ड. सुनील डोंगरे यांनी नांदेड येथे धावती भेट दिली, त्यावेळी त्यांचा हॉटेल ताज पाटील येथे भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला, यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधला.

आपल्या मनोगतात ड. सुनील डोंगरे पुढे म्हणाले की, सन २०२७ मध्ये उत्तर प्रदेशात विधानसभा निवडणुका होणार असून त्यात बहुजन समाज पार्टीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. लोक आता मोदी आणि योगी यांना कंटाळले आहेत, त्यामुळे बहुजन समाज पार्टीची उत्तर प्रदेशात पूर्ण बहुमतांनी पाचव्यांदा सत्ता येणार असून बहन मायावती पुन्हा मुख्यमंत्री होणार आहेत. याचा परिणाम २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत होणार असून बहन मायावतीजी यांच्या हातात केंद्रीय सत्ताही एकवटणार आहे. बहन मायावतीजी यांची लवकरच देशात सत्ता येणार आहे.

बहुजन समाज पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व धडाडीचे नेते ड. सुनील डोंगरे यांचे यावेळी राज्य कार्यकारिणी सदस्य इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, मराठवाडा झोन प्रभारी मनिषभाऊ कावळे, नांदेड जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे, शहर कोषाध्यक्ष नारायण घुले, सचिन गायकवाड आदींनी पुष्पहार घालून भव्य स्वागत केले. ड. सुनील डोंगरे यांच्या समवेत संजय थूल, धम्मा दहिवळे हे मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे यांनी यावेळी थोडक्यात आपल्या आजवरच्या कामाचा अहवाल सादर केला. याबद्दल समाधान व्यक्त करुन नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभा पदाधिकाऱ्यांची नव्याने निवड करुन सर्व विधानसभा पदाधिकाऱ्यांचे एक दिवशीय प्रशिक्षण शिबीर नांदेड येथे लवकरच आयोजित करण्याची सूचना यावेळी ड. सुनील डोंगरे यांनी केली.

## मुंबईत १८ एप्रिलला युवाशक्तीचा महासंगम

### युवासेना महायुवोत्सवास बीड जिल्हा सह मराठवाड्यातील पदाधिकारी व युवासैनिक मोठ्या संख्येने सहभागी होणार - विपुल बाळासाहेब पिंगळे

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यभर युवासेनेची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्यासाठी आणि नव्या तरुण नेतृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी युवासेनेचे वार्षिक संमेलन महायुवोत्सव २०२६ शनिवार, १८ एप्रिल रोजी मुंबईतील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत हा महायुवोत्सव पार पडणार असून, राज्यभरातून सुमारे १५ हजार युवक सहभागी होणार आहेत.

या संदर्भात वरळी येथे आयोजित पत्रकार परिषदेत युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी माहिती दिली की, शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे आणि युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या नेतृत्वात हा महायुवोत्सव संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून, याचवेळी युवासेनेच्या अधिकृत वेबसाइटचे अनावरण करण्यात येणार आहे. तसेच सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ आणि युवासेनेचे नवीन प्रेरणादायी गीतही या मंचावरून प्रदर्शित केले जाणार आहे.

युवकांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा, संघटन विस्तार, नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी नव्या दिशा ठरवण्याचा संकल्प या मंचावरून व्यक्त केला जाणार आहे. हा महायुवोत्सव युवकांना नवी ऊर्जा, प्रेरणा आणि दिशा देणारा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या मेळाव्यास बीड जिल्हा सह मराठवाड्यातील युवासेना पदाधिकारी, युवासैनिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा युवासेना मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी दिली. मराठवाडा विभागातील जिल्हाभरात बैठका, नियोजन आणि जनजागृती मोहीम राबवून मोठ्या उपस्थितीसाठी तयारी सुरू आहे.

बीड जिल्ह्यातील व मराठवाड्यातील युवकांमध्ये या महायुवोत्सवाबाबत मोठा उत्साह असून, गावागावांतून युवक सहभागी होण्यासाठी पुढाकार घेत आहेत. मोठ्या संख्येने सहभागी होऊन युवाशक्तीचा बुलंद आवाज राज्यभर पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, गृहराज्यमंत्री योगेश कदम, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार धैर्यशील माने, खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्यासह शिवसेनेचे मंत्री, वरिष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित राहून युवकांना मार्गदर्शन करणार आहेत.प्रगतीशील, सक्षम आणि युवकप्रधान महाराष्ट्र घडविण्यासाठी हा महायुवोत्सव एक ऐतिहासिक टप्पा ठरेल, असा विश्वास युवासेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



पुणे प्रतिनिधी : लक्ष्मण कांबळे

पुणे -येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (इ-ठढख) येथे भीम आर्मीच्या शिष्टमंडळाने बार्टी आयुक्तांची भेट घेऊन अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणासंदर्भात निवेदन सादर केले. यावेळी उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेविषयी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

संबंधित अहवाल तात्काळ जाहीर करावा व उपवर्गीकरण प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांवर घाला घालणारे कोणतेही उपवर्गीकरण भीम आर्मी कोणत्याही परिस्थितीत मान्य करणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. हा केवळ इशारा नसून निर्णायक संघर्षाची सुरुवात असल्याचे सांगण्यात आले. जर मागण्या तात्काळ मान्य करण्यात आल्या नाहीत, तर राज्यभरात तीव्र व लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. या शिष्टमंडळात भीम आर्मी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अशोक कांबळे, स्वाती ताई गायकवाड, ॲड. तोसिफ शेख, ॲड. क्रांती सहाणे, अभिजित गायकवाड, मोहम्मद आसिफ मन्सरी, सनी कांबळे, सावंत साहेब, संदीप शेलार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ. गीता शिनगारे यांनी एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याबद्दल जिजाऊ परिवाराकडून भव्य सत्कार

**मराठा सेवा संघ बीड जिल्हा व राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आवसगाव यांच्या वतीने आयोजन**

बीड ।प्रतिनिधी

मौजे आवसगाव (ता. केज जि. बीड) येथे दि. १६ एप्रिल वार गुरूवार रोजी राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आवसगाव, मराठा सेवा संघ बीड जिल्हा तसेच जिजाऊ परिवाराच्या महिला पदाधिकारी यांच्या वतीने औक्षण करून एमबीबीएस पदवी संपादन करणाऱ्या गुणवंत कु. डॉ. गीताताई बन्सी (आण्णा) शिनगारे यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

डॉ. गीताताई शिनगारे यांनी अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस ही पदवी गुणवत्तेसह उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल गावात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी मुख्य आयोजक गोविंद नाना शिनगारे, संतोष बापू शिनगारे आणि श्री. सुरेशराव खाडपे यांच्या हस्ते आदर्श प्रेरणास्थान



स्वराज्य प्रेरणा राजमाता जिजाऊ माँसाहेबांची भव्य प्रतिमा, शाल व पुष्पहार देऊन डॉ. गीताताई यांचा सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमास डॉ. गीताताई यांच्या पालक मा. श्री. बन्सी (आण्णा) शिनगारे यांच्यासह संपूर्ण शिनगारे परिवार उपस्थित होता. याशिवाय गावातील मान्यवरांमध्ये श्री. भारत दादा शिनगारे, श्री. सुरेश खाडपे, श्री. काशिनाथ बाबा साखरे, श्री. गोविंद पवार (माजी सरपंच), श्री. विजयसिंह साखरे, श्री. कृष्णा साखरे, ॲड. सयाजी साखरे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे अध्यक्ष श्री. आकाश भैय्या आदमाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. निता शिनगारे यांनी मनोगत व्यक्त करताना डॉ. गीताताई यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांचे परिश्रम, कुटुंबीयांचे पाठबळ तसेच गुरुजनांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले. त्यांनी या सर्वांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.तसेच जिजाऊ परिवारातील सदस्य संतोष बापू शिनगारे आणि गावातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास शोभा आणली.या सत्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी डॉ. गीताताई शिनगारे यांच्या यशाचे कौतुक करताना, त्यांनी भविष्यात आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजाची सेवा करण्यासाठी तत्पर आसवे असे मनोगत प्रसंगी सांगितले व गोविंद नाना शिनगारे यांनी राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आवसगाव व मराठा सेवा संघ बीड जिल्हा सह जिजाऊ परिवाराच्या वतीने सत्कार केल्याबद्दल डॉ गिता शिनगारे यांनी मनःपूर्वक आभार मानले संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# रामेश्वरवाडी शाळेची अभिमानास्पद कामगिरी; मंथन परीक्षेत विद्यार्थी अव्वल

बीड ।प्रतिनिधी

मंथन जनरल नॉलेज परीक्षा २०२६ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामेश्वरवाडी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा लौकिक वाढवला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. नांदूर घाट परिसरातील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा नांदूर येथे पार पडली.या परीक्षेत मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि बुद्धिमत्ता या विषयांचा समावेश होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरण मिळावे व त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

रामेश्वरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी मनापासून तयारी केली. मंथन पुस्तक व प्रश्नपत्रिका संच यांचा सखोल अभ्यास करून विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्यात आले. यासाठी शाळेतील शिक्षक श्री. अशोक खोसे सर, श्रीमती वाघ मॅडम, श्री. प्रशांत सुरवसे तसेच श्रीमती मुंडे मॅडम (ट्रेनी शिक्षक) यांनी विशेष मार्गदर्शन केले.या मेहनतीचे फलित



म्हणून इयत्ता दुसरीतील चि. रिषभ अमोल धन्वे यांनी केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवून उज्ज्वल यश संपादन केले, तर इयत्ता चौथीतील कु. प्रणिता प्रदीप हांगे हिने केंद्रातून तृतीय क्रमांक पटकावला.या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती तसेच रामेश्वरवाडी गावकऱ्यांच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सर्वपक्षीयांचे अभिवादन

**१३ वर्षांपासून लोकजनशक्ती पार्टीच्या पुढाकाराने विविध उपक्रमांचे आयोजन - आयोजक राजेश वाहुळे यांची माहिती**





अंबाजोगाई (प्रतिनिधी) उमेश शिंदे

शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंतीनिमित्त यशवंतराव चौक येथे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुरज तेरकर, आयोजक राजेश वाहुळे, मार्गदर्शक भिमराव सरवदे यांनी दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी विविध लोकोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

सर्वप्रथम सत्यशोधक अण्णा भाऊ साठे व्यापारी संकुल येथे झेंडावंदन करण्यात आले. त्यानंतर यशवंतराव चव्हाण चौक येथे डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. तसेच भीमगीतांचा कार्यक्रम शाहीर व त्यांची टीम तसेच जयंतीला आलेल्या सर्वांसाठी भोजन देऊन जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी केज विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, उपनगराध्यक्ष दिनेश भराडीया, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक संजय गंभीरे, चंद्रशेखर वडमरे, शोभाताई सुनीलकाका लोमटे, भिमसेन लोमटे, नगरसेवक मालू जोगदंड, नगरसेवक ॲड.काकडे, नगरसेवक महेश कदम, नगरसेवक मुन्नाभाई पठाण, नगरसेवक महेश लोमटे, नगरसेवक मोहसीन भाई, नगरसेवक अकबर भाई, सामाजिक कार्यकर्ते जावेद गवळी, डॉ.अनिल मस्के, डॉ.साखरे, माजी नगरसेवक कमलाकर कोपले, संतोष मोहिते, शिवसेना नेते मदनलाल परदेशी, लोहिया, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, ॲड.अरविंद मोटेगावकर, बापू केंद्रे, यशपाल बनसोडे, सचिन अंजान, राम जाधव, प्रशांत जगताप, ॲड.इस्माईल गवळी, सुगत सरवदे, हमीद चौधरी, महात्मा फुले वसतीगृह अधीक्षक बनसोडे, प्रकाश सरवदे, नामदेव मामा राठोड, माजी सरपंच भिसे, वाघमारे सर, अविनाश बेजगावकर, मंगेश जोगदंड, शैलेश गोस्वामी, प्रशांत भैया, मस्के, पत्रकार आरेफभाई, शेख फिरोज भाई, माजी नगरसेवक वाजेद खतीब, वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, पीएसआय बाळासाहेब रोडे, निखिल पाडुळे, पप्पूभैया आपेट, तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, कृष्णा सुनीलकाका लोमटे, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाहुळे, प्रहार संघटनेचे जहांगीर मीर खान पठाण, शेख रमिज सर, जिल्हा परिषद सदस्य शंकरराव उबाळे, माजी सरपंच कचरे, भैय्या लोमटे, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, कॉंग्रेसचे नेते संजय वाघमारे, उमेश शिंदे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुनील जगताप, डॉ.मस्के सर, शिवसंग्रामचे धनेश गोरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते दीपक कांबळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष प्रमोद दासूद, जमील जहांगीरदार, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे, सरपच बाळासाहेब केंद्रे, युवा नेते अमित जाजू, पत्रकार शेख जमीर भाई, सतीश क्षीरसगर, ॲड.कातखडे, सरपंच तथा संचालक बाजार समिती तानबा लांडगे, सामजिक कार्यकर्ते सुधाकर जोगदड, लोकजनशक्ती पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे, विशाल शेवाळे, प्रदीप गुंडरे, धम्मा वाघमारे, युवा नेते पंकज मस्के, धीमंत राष्ट्रपाल, रत्नदीप बनसोडे, पत्रकार शेख फिरोज, आदित्य चौरे, समितीचे अशोक बनसोडे, बालू, सचिन बनसोडे, मुळे, बंटी गायकवाड, सिद्धेश जाधव, जितेश जाधव, विलास कसबे जोतिर्लिंग जोगदंड, अक्षय पाटोळे, कैलास मस्के, अरूण धायगुडे आणि सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने मागील १३ वर्षांपासून पुढाकार घेऊन एक आगळावेगळा भिमजन्मोत्सव साजरा केला जातो. त्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण चौक अंबाजोगाई येथे विविध उपक्रम राबवून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात येत आहे. यामध्ये १४ एप्रिल रोजी रात्री बारा वाजता झेंडावंदन, सकाळी महामानवांना अभिवादन, व्याख्यान, भिमगीतांची संगीत रजनी कार्यक्रम, मतिमंद शाळेतील मुलांना खाऊ वाटप, यशवंतराव चव्हाण चौक येथे खिचडी वाटप असे विविध दिशादर्शक उपक्रम राबविण्यात येतात हे विशेष होय.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महात्मा फुलेनगरात विविध कार्यक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या महात्मा ज्योतिराव फूले नगर येथे शिस्तबद्ध वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त फुलेनगर च्या वतीने मुक व कर्नबधिर यांना खिचडी वाटप करण्यात आली.सायंकाळी खिचडी, अन्नदान व पाणी पाऊचही देण्यात आले.फुलेनगर मित्र मंडळाच्या माध्यमातून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करूण ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी, मा.आमदार पृथ्वीराज साठे, अंबाजोगाई न.प. उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया,माजी नगरसेवक कमलाकर आण्णा कोपले,नगरसेवक संजय गंभिरे, दिग्गविजय लोमटे, पत्रकार अभिजित लोमटे ,शेख फेरोज, रिपब्लिकन बहुजन सेनेचे जि.अध्यक्ष दयानंद लांडगे , सुरेश मिसाळ, मराठी पत्रकार परिषदेचे ता.अध्यक्ष बालाजी खैरमोडे, संपादक एसएस उदारे, नगर सेवक सचिन जाधव, किरण भालेकर,डॉ.इंगोले व ईतर मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण केले.

याप्रसंगी 'बाबासाहेबांचे सामाजिक विचार आणि वर्तमान काळ' या विषयावर मा.आ. पृथ्वीराज साठे,सुरेश मिसाळ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.यात अनेक विचारवंतांनी बाबासाहेबांच्या समतावादी विचारांवर प्रकाश टाकला. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशस्वीपणे राजू बलाडे, कैलास वाघमारे, रोहित ढवारे , आदित्य गायकवाड , प्रविण जोगदंड, निलेश जोगदंड, रोहित वाघमारे, रूपेश वाघमारे, निखिल जोगदंड , गोविंद शिंदे ,आमर जोगदंड, प्रदिप थोरात,रवि मस्के,सुरज पोटभरे, बबन वावळकर, धनराज जोगदंड, महेंद्र मस्के यांनी परिश्रम घेतले.यावेळी मोठ्या संख्येने नागरिक,महिला आणि तरुण कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पत्रकार मारुती जोगदंड यांनी केले, तर आभार साहेबराव लोंढे यांनी मानले.यावेळी नागरिक,महिला आणि तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

## खंदारे गुरुजींची गुरुवचने





डॉ संगिता पिंगळे
बीड

सरळ व्हा आणि सरळ जा प्रभुकडं असे गुरुजी सांगतात. खरेच प्रभुकडे जाण्याचा एकच मार्ग आहे सरळत्व म्हणजे निष्पाप निरागस शुद्ध स्वच्छ मन. ही तर सद्गुरू, प्रभुची देण आहे. अलीकडे चालाखी करून लवकर सर्वसंपन्न बनण्याकडे समाजाचा कल आहे. अध्यात्मात असे चालत नाही. गुरुकृपा झाली की सरलत्व येतं. सरळ असलेल्या साधकाला सगळे सरळच दिसते अन त्यामुळे तो मलीन होत नाही, शुद्ध असतो. शुद्ध म्हणजेच सिद्ध असे गुरुजी सांगतात. शुद्ध साठी प्रभू भेटही सरळ आणि सहज आहे. गुरुजी आपण प्रत्यक्ष अनुभव देऊन मार्गदर्शन केल्यामुळे हे सरळ प्रभुकडं जाणे सोपे झाले थँक्स .गुरुजी आपला नित्य जयजयकार असो.

# आंबेडकरवादी विचारांची लोकचळवळ अधिक गतीमान करा - ॲड. शाम तांगडे यांचे आवाहन

अंबाजोगाई (प्रतिनिधी) : उमेश शिंदे

संघर्षभूमी येथे आयोजित भीमजयंती अभिवादन कार्यक्रमात आंबेडकरवादी चळवळीचे जेष्ठ भाष्यकार ड. शाम तांगडे यांनी प्रभावी विचार मांडत आंबेडकरवादी विचारांची लोकचळवळ अधिक गतीमान करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीस तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प व पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण व पंचशील ग्रहण करून महामानवांच्या जयघोषात प्रचंड पुष्पवर्षाव करण्यात आला. यानंतर ड. शाम तांगडे यांनी भीमजयंतीचा विचार संदेश दिला.

आपल्या भाषणात ते म्हणाले की, संघर्षभूमीवर मागील दहा वर्षांपासून नियमितपणे होणारा १४ दिवसीय भीमजयंती कार्यक्रम हा एकमेव वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम आहे. मात्र, या कार्यक्रमासाठी आवश्यक निधी लोकवर्गणीतून पुरेसा मिळत नाही. त्याउलट अनावश्यक डीजे व नाच-गाण्यांसाठी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला जातो, ज्यामुळे चळवळीच्या गतीला अडथळा निर्माण होतो.

ते पुढे म्हणाले की, देशाला स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचा खरा राष्ट्रवाद देणारे आंबेडकरवादी आहेत. शासनाचे अनेक कार्यक्रम हे लोकांमध्ये जाऊन त्यांची दिशाभूल करण्यासाठीच राबवले जातात. त्यामुळे अशा गोष्टींपासून दूर राहून लोकांना विचार व चिंतनाच्या कार्यक्रमाकडे वळवणे आवश्यक आहे. संघर्षभूमीने याच उद्देशाने मनोरंजनात्मक कार्यक्रम बंद करून विचारप्रबोधनाचे कार्य हाती घेतले आहे.देशभरात आंबेडकरवादी विचारांची जागृती मोठ्या प्रमाणात वाढत असून, त्याचा दबाव शासन व प्रशासनावर जाणवू लागला आहे. महाड संग्रामाला १०० वर्षे व महात्मा फुले यांच्या जयंतीचे २०० वे वर्ष पूर्ण होत असल्याने या चळवळीला अधिक बळ मिळत आहे. समाजात विचार आणि जागृतीचा प्रभाव वाढत असताना प्रतिक्रांतीच्या शक्तींना रोखणे आवश्यक आहे. आंबेडकरवाद्यांकडे खऱ्या राष्ट्रवादाचे ज्ञान असल्याने त्यांनी अधिक सक्रिय होऊन वर्तमानातील अव्यवस्था बदलण्याचे काम हाती घ्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश सूर्यवंशी यांनी केले. हिशोबपत्राचे वाचन




संजय हतागळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. किर्तीराज लोणारे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप सरणत्तय गाथेने झाला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभाष घाडगे, विश्वनाथ सावंत, मिलिंद कांबळे, नरसिंग तरकसे, बलभीम बनसोडे, खंडेराव जाधव गुरुजी, गुलाबराव गायकवाड, मुरलीधर कांबळे, श्रीकृष्ण होके, बबन ठोके, डॉ. किर्तीराज लोणारे, पंकज भटकर आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी विविध नगरांतील उपासक-उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच १ एप्रिल ते १४ एप्रिलदरम्यान होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाचे वृत्तांकन करणारे पत्रकार प्रशांत मस्के व व्यंकटेश जोशी यांची विशेष उपस्थिती होती.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PUBLISHED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB ON BEHALF OF HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( MAHARSHTRA).
EDITOR- HANDIBAG DATTATRAY BALASAHEB